वाचाः- १)या कार्या आदेश क्र.आरोग्य/अस्था४/३४३/२०१५ दि.२०/४/२०१५
२)मा.राज्यमंत्री,ग्रामविकास यांचेकडील आदेश क्र.डीईएन २०१७/ प्रक्र २९/अस्था१२ दि.३/६/१७
३)मा.मु.का.अ.जि.प.नाशिकयांचेकडील मंजूर टिपणी दिनांक - 13/10 /२०१७

आदेश

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
आरोग्य विभाग
जा.क्र.आरोग्य/आस्था४/४५९/१७
दिनांक - 25 /10 /२०१७

ज्या अर्थी श्री.बद्रीनाथ भिकाजी भड, आरोग्य सहाय्यक,प्राथमिक आरोग्य केंद्र तळेगावरोही ता.चांदवड यांचे उक्त वाचा क्र. १अन्वये श्री.भड,आरोग्य सहाय्यक, स्थावर मालमत्ता खरेदी करण्यापुर्वी नियुक्ती प्राधिकरणाची पुर्व परवानगी न घेता संपादित केल्याने मुळ वेतनावर आणण्याची शिक्षा देण्यात येत आहे, असा आदेश या कार्यालया कडुन पारीत करण्यात आलेला आहे.श्री.भड.आ.सहाय्यक यांनी आदेशात नमुद शिक्षेविरुद्ध मा.अप्पर आयुक्त विभाग नाशिक यांचेकडेस इएमपी अपील नं.१८/२०१५ दाखल केले. सदरचे अपीलापर निर्णय होवुन दि.२२/११/२०१६ च्या मा.अप्पर आयुक्त नाशिक यांचेकडील निर्णयानुसार अपील फेटाळण्यात आले.श्री.भड,आ.सहाय्यक यांनी सदरचे दोन्ही आदेशाविरुद्ध मा.ना.राज्यमंत्री यांचे कार्यालयास दि.२३/१/२०१७ रोजी पुर्नरिक्षण अर्ज दाखल केला.सदर प्रकरणांची सुनावणी दि.१८/४/२०१७ रोजी मंत्रालय मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती.सुनावणी अंती श्री.भड,आ.सहाय्यक यांचा अर्ज अंशतः मान्य करण्यात आलेला आहे.

ज्या अर्थी वाचा क्र.१ चा आदेश या आदेशान्वये रद्द करणेत आला असुन श्री.भड, आरोग्य सहाय्यक यांचा सुधारीत आदेश खालील प्रमाणे करणेत येत आहे.

त्या अर्थी श्री.भड, आरोग्य सहाय्यक यांची **महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग ३ मधील कलम ४(२)** त्यांची एक वेतनवाढ एक वर्षासाठी पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने रोखुन ठेवणेस या आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करणेत येवुन आदेशाची नोंद श्री.भड,आरोग्य सहाय्यक यांच्या मुळ सेवा पुस्तकात घेणेत यावी.

13/10

(दिपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**

**म. गट विकास अधिकारी, पंचायत समिती चांदवड**
**प्रतः- तालुका वैद्यकिय अधिकारी, पंचायत समिती चांदवड**
**प्रतः- वैद्यकीय अधिकारी,प्रा.आ.केंद्र पथक तळेगावरोही ता.चांदवड**
**प्रतः- मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक.**
**प्रतः- कार्यालयीन प्रत.**